# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०६/०६/२०१९

## दि.०५/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४१०/१९,भादविक ३९९,४०२ |
| **फिर्यादी** | नवनाथ मोहिते, पो.ना. येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | १.सुरजीतसिंग राजपालसिंग टाक,वय-३० वर्ष,रा.बिराजदार नगर,हडपसर,पुणे २.गोंगलसिंग शामसिंग कल्याणी,वय-४७ वर्ष,रा.रामटेकडी,हडपसर,पुणे (अटक) व इतर तीन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०६/२०१९ रोजी ०१/५० वा.आंबेडकर सांस्कुतिक हॉलचे समोर बस स्टॉपचे बाजुला येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनीआप-आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रति बंधात्मक आदेशाचा भंग करून,बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे लोखंडी सुरे, एक स्क्रु-ड्रायव्हर, लोखंडी कटावणी, लोखंडी बोर कटर, नायलॉन दोरी, मिरची पावडर, पेपर स्प्रे, इत्यादी घातक शस्त्रे तसेच कार नं.एमएच/१२/जीआर/५३२५ व मोटार साकयल असा एकुण १,५२,४८०/- रुपये किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी येरवडा भागातील एटीएम फोडुन दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ व २ हे मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मंगेश भांगे ८८०५३३३०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४११/१९,भादविक ३२४,५०६(२)३४,क्रिमिनल अमेडमेंट कलम ७, महा.पो.का. क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | पोपट माळवे,वय-३९ वर्ष,रा.कात्रजगाव,नवीन वसाहत,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०६/२०१९ रोजी १७/३० वा.कात्रज गाव,नवीन वसाहत,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे चुलत भावाचा मुलगा रणवीर यास कात्रज तळ्यावर,यातील नमुद इसमांनी दिलेल्या त्रासाबद्दल फिर्यादी यांनी त्यांना जाब विचारल्याचे कारणावरून त्यांनी चिडुन जावुन,नमुद ठिकाणी हातात कोयता घेवुन,फिर्यादी यांचे परिसरात दहशत माजवुन, त्याठिकाणी सर्व लोकांचे पळापळ होत असताना,फिर्यादीचे बहीणीस शिवीगाळ करुन तीस ढकलुन दिले. तसेच वस्तीतील अजय शिंदे याचे घराचे दरवाजावर कोयत्याने मारून,त्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच आकाश माळवे याचेवर कोयत्याने वार करीत असताना त्याने तो वार हाताने अडविला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४१२/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सुलतान शेख,वय-२८ वर्ष,रा.भिलारेवाडी,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | एक बांधकाम व्यावसाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०६/२०१९ रोजी ०५/०० ते ०५/२० वा.चे दरम्यान स.नं.२/१२,भिलारेवाडी,कात्रज,पुणे येथील अनिल ज्ञानदेव खोपडे यांच्या चौथ्या माळा असलेल्या इमारतीचे तळ मजल्याचे उघड्या झाकणाच्या पाण्याच्या टाकीत |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसम बांधकाम व्यावसाईकाने त्याचे स.नं.२/१२,भिलारेवाडी,कात्रज,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवर कोणताही सुरक्षारक्षक न ठेवता,दुर्लक्षीत करून,सदर ठिकाणी असलेल्या पाण्याचे टाकीचे झाकण उघडे ठेवुन,हलगर्जी व निष्काळजीपणा केल्या मुळे फिर्यादी यांचा मुलगा पिल्लु उर्फ समर उर्फ सुलतान शेख,वय-०३ वर्षे,रा.स.नं. २/१, भिलारेवाडी,कात्रज,पुणे हा त्याचे घरासमोर खेळत असताना,तो त्याचे घरा समोरील बोळीत खेळत बांधकाम चालु असलेल्या इमारतीचे तळमजल्या वरील पाण्याचे टाकीचे झाकण उघडे असल्याने,त्याचा तोल जावुन तो उघडया पाण्याचे टाकी मध्ये पडुन,त्याचे नाका तोंडात पाणी जावुन,त्याचा मृत्यु झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.आर.चिवडशेट्टी ८१०८२२२०६८ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १९३/१९,भादविक १२०(ब),४०६,४१७,४१८,४२०,४६३,१६४,४६५,४६७,४६८, ४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६८ वर्षे,रा.सहरकारनगर,पुणे |
| **आरोपी** | श्री.शंकरनगरी सहकारी गृह रचना संस्था मर्या.सं.नं.८५/१,पौड रोड कोथरुड,पुणेचे १. चेअरमन २.सचिव व इतर एक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०६/२०१४ ते आजपोवतो दरम्यान श्री.शंकरनगरी सहकारी गृहरचना संस्था मर्या.सं.नं. ८५/१,पौड रोड,कोथरुड,पुणे येथील ऑफीस मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद श्री.शंकरनगरी सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत सं.नं.८५/१,पौड रोड कोथरुड,पुणेचे १.चेअरमन २.सचिव व इतर इसम यांनी संगनमत करून,फिर्यादी यांचे कंपनी कडुन त्यांचे सोयायटीचे रस्त्याचे व कॉक्रींटचे काम करवुन घेवुन,त्याचे अंतिम बील २३,८३,४३६/- रूपये एवढे असताना,त्यातील एकुण १२,५०,०००/- रुपये फिर्यादी यांना देवुन, त्यातील बाकी ११,३३,४३६/- एवढी रक्कम तसेच टोटल मशीनव्दारे केलेल्या मोजामापाचे अहवालीची मुळप्रत फिर्यादी यांना न देता,त्यांचे अहवाला मध्ये सोसायटीच्या पदाधिका-यांनी फेरफार केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. देवकर ८८८८४०२२९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २७५/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-७४,रा.२०३,गुरुवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०३/२०१८ ते दि.२६/०४/२०१८ रोजीच दरम्यान ग्लोबल हॉस्पीटल जवळ असलेल्या अपार्टमेंट मधील एका फ्लॅट मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना तुमचे मुलीस पुणे महानगर पालीकेत लिपीक म्हणुन नोकरी लावतो असे आमिष दाखवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचेकडून एकुण ३,५०,०००/- रूपये रोख रक्कम घेवुन,त्या बदल्यात सदर इसमाने त्याचे बँकेचे खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही हे माहित असतानादेखील,त्याने फिर्यादी यांना दोन धनादेश देवुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. भालेकर ९९२३०१८१७३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २४२/१९,भादविक ३८५,३५२,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२२ वर्ष,रा.गोळीबार मैदान,वानवडी,पुणे |
| **आरोपी** | मुस्लीम यंग सर्कल काशेवाडी,भवानी पेठ,पुणे या मंडळाचा कार्यकर्ता व इतर तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०६/२०१९ रोजी २०/३० वा. ३१६,सापीका रोड,कासेवाडी पुणे येथील दुकाना मध्ये |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ३१६,सापीका रोड,कासेवाडी पुणे येथील दुकाना मध्ये हजर असताना, यातील नमुद मुस्लीम यंग सर्कल काशेवाडी,भवानी पेठ,पुणे या मंडळाचा कार्यकर्ता व त्याचे बरोबर असलेल्या इतर साथीदारांनी संगनमत करून,फिर्यादी यांना ईद या सणाची वर्गणी मागण्यासाठी दुकानात आले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना आता माझे दुकाना मध्ये कस्टमर आहेत,तुम्ही नंतर या असे सांगत असतांना,सदर कार्यकर्ता याने फिर्यादीस चापट मारुन,इतर साथीदारांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्यांचे दुकानाची विंडो डिप्लेसीची काच हाताने मारुन फोडुन खिडकीचे ५००/- रुपये किंमतीचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमाजी राठोड ८८०५१६२६९१ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४९३/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | रिझवान खान,वय-३३ वर्षे,रा.आश्रफनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०६/२०१९ रोजी रात्रौ २२/०० वा.ते दि.०३/०६/२०१९ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान गरीब नवाज चिकन सेंटर दुकान,आश्रफनगर,कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे गरीब नवाज चिकन सेंटर दुकानाचे शटर कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे दुकानाचे शटर बनावट चावीचे सहाय्याने उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,दुकाना मधील कपडे,बँकेचे पासबुक,जमिनीचे मुळ दस्ताऐवज व रोख २,१०,०००/- रुपये रक्कम घरफोडी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चेतन मोरे ९८७०३२७७०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**